Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date 13 October 2025
Time 11.00 to 11.05 AM
Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ सकाळी ११.०० वाजता

****

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. या टप्प्यात २० जिल्ह्यांतल्या १२२ मतदारसंघांमध्ये निवडणूक पार पडणार असून, उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया आजपासून सुरू होईल. या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख २० ऑक्टोबर, छाननी २१ ऑक्टोबर, आणि अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २३ ऑक्टोबर अशी आहे. दुसऱ्या टप्प्यातलं मतदान ११ नोव्हेंबरला होणार आहे.

दरम्यान, बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक काल दिल्लीत झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यावेळी उपस्थित होते.

या निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं जागावाटप निश्चित झालं आहे. भारतीय जनता पक्ष आणि संयुक्त जनता दल प्रत्येकी १०१ जागांवर निवडणूक लढवतील, तर लोक जनशक्ती पक्ष रामविलास या पक्षाला २९ जागा दिल्या आहेत. राष्ट्रीय लोक मोर्चा आणि हिंदुस्थानी आवाम मोर्चा हे पक्ष प्रत्येकी ६ जागांवर उमेदवार उतरवणार आहे.

****

देशात शालेय स्तरावरील हॅकेथॉन स्पर्धा, विकसित भारत बिल्डेथॉन २०२५ आज आयोजित करण्यात आली आहे. देशभरातल्या शाळांमधल्या इयत्ता सहावी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना त्यांची सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याचं कौशल्य दाखवण्यासाठी सक्षम बनवणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यावर्षीची स्पर्धा, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी, व्होकल फॉर लोकल आणि समृद्ध भारत या चार संकल्पनांवर आधारित आहे. या स्पर्धेतल्या, राष्ट्रीय स्तरावरील दहा, राज्यस्तरावरील १०० आणि जिल्हास्तरावरील एक हजार विजेत्यांना एकंदर एक कोटी रुपयांची पारितोषिकं वितरीत करण्यात येतील.

****

देशातले ५२ लाखापेक्षा जास्त शेतकरी आता अकराशेपेक्षा जास्त कृषी उत्पादन संघटनांशी जोडलेले असून, याद्वारे त्यांच्या पिकाला चांगली किंमत मिळत आहे, त्यामुळे उत्पादकताही वाढली असल्याचं, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं. या सर्व संघटनांची उलाढाल १५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

****

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अनेक ठिकाणी कृत्रिम फुलांची विक्री होत आहे. प्लास्टिक पॉलिथिन पासून बनलेल्या कृत्रिम फुलांमुळे नैसर्गिक फुलशेती करणारा शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्याचवेळी प्लास्टिक पॉलिथिनमुळे निसर्गाची हानी होत आहे, या कृत्रिम फुलांना कायमस्वरूपी बंदी घालावी अशी मागणी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे केली आहे. याबाबतीतला शासन निर्णय अद्याप झाला नसून या फुलांच्या विक्रीवर तातडीनं बंदी घालण्याची मागणी पर्यावरण प्रेमी करत आहेत.

****

राजर्षि शाहू सहकारी बँकेच्या वतीनं उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीला ११ लाख रुपयांचा धनादेश सुपुर्द करण्यात आला. राज्यातल्या पूरग्रस्तांना मदत करण्याकरता विविध क्षेत्रातल्या व्यक्ती, सामान्य संस्था पुढे येऊन सढळ हाताने मदत करत आहेत. पूरग्रस्तांना अधिकाधिक मदत करावी, असं आवाहन अजित पवार यांनी यावेळी केलं.

बीड इथल्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीला पाच लाख रुपयांची मदत दिली आहे. संस्थेतर्फे हा धनादेश काल जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

पालघर इथल्या दांडेकर महाविद्यालयातल्या करियर कट्टा विभागाने देखील महाविद्यालयाच्या मदतीने  सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत मराठवाड्यातल्या पुरग्रस्तांना आर्थिक मदत केली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महापालिकेने गोमांस विक्री प्रकरणी दोन जणांवर कारवाई केली आहे. त्यांच्या ताब्यातून ३०० किलो प्रतिबंधित गोमांस हस्तगत करण्यात आलं. या दोघांविरोधात पशू संरक्षण कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

पुण्यातल्या एका व्यावसायिकाची शेअर बाजारात गुंतवणूक दाखवून एक कोटी ११ लाख ८० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यास गुन्हा नोंदवण्यात आला आहे. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगल्या परताव्याचं आमिष दाखवून आणि गुंतवणूक केल्यानंतर परतावा मिळाल्याचं भासवत चोरट्यांनी ही फसवणूक केली.

****

मलेशियात जोहोर बहरू इथं सुरू असलेल्या, सुलतान जोहोर कप कनिष्ठ पुरुष हॉकी स्पर्धेत काल भारताने न्यूझीलंडचा ४-२ असा पराभव केला. भारताकडून अर्शदीप सिंग, पीबी सुनील, अराईजित सिंग हुंडल आणि रोशन कुजूर यांनी प्रत्येकी एक गोल केला. भारताचा पुढीचा सामना उद्या पाकिस्तानविरुद्ध होणार आहे.

****

राज्यात येत्या १५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात आभाळी हवामान आणि दुपार नंतरचा वादळी पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

****